

# काव्यविभाग

जैसा हरळामाजी रत्नकीळा । की रत्नांमाजी हिरा निळा ।

तैसी भासांमासी चोखळा । भासा मराठी ॥

जैसी पुस्पामाजी पुस्प मोगरी । की परिमळामाजी कस्तुरी ।

तैसा भासांमाजी साजिरी । मराठीया ॥

– फादर स्टीफन्स

## कैफियत एका मुलीची (स्वरचित)

- पुनम प्रकाश मोढे
प्रथम वर्ष वाणिज्य

आई,
खरं सांग
पैशाने सर्व सुख मिळते का ग ?
''तुझ्या सौंदर्यावर
मोहीत होऊन कुणीही राजकुमार हसत हसत
उचलून नेईल माझ्या सुंदर परीला''
असं तूच म्हणत होतीस ना ?
पण आई ग !१
राजकुमाराऐवजी
राक्षसांनी उचलुन नेलय बघ मला
बाबा म्हणतात
''मुलींना स्वत:ची पसंती नसते''
''आई हीच का ग आपली रुढी ?''
आणि ''हो ला हो, मिळविणे हीच
का ग आपली संस्कृती ?''
आई,
''दागिन्यांच्या ओझ्याखाली जीव घुसमटतोय माझा
आणि दररोजचा
जीवघेणा बलात्कार लोटतोय खोल गर्तेत
आई सांग ना
या पिढ्यानपिढ्या चाललेल्या
अनिष्ट रुढी परंपरेतुन मानसिक
आणि शारीरिक बलात्कारातुन आपल्या आदर्श
भारतीय संस्कृतीचे आधारस्तंभ
खरचं जन्म घेतील का ग ?''
आणि,
''जन्म घेतलाच तर ते आपल्या
भारतभूमीला आया बहिणींना
या मानवरूपी राक्षसांच्या, पशुंच्या
पंजातून सोडवू शकतील का ग ?''

## नवा समाज

-पुनम प्रकाश मोढे
प्रथम वर्ष वाणिज्य

हळद ओले ठसे तुझे
स्वप्नभरल्या काळजामधून
सगळ्यांसारखे नऊ दिवस
हळुहळू विरली मेंदी
पोपड्यांचे अंगण सखे
तडकलेल्या मनांवरती
काही काही जमवताना
आयुष्याला शापवणारे,
अजुन थोडी वेळ आहे
भित्यापाठी ब्रह्मराक्षस,
तुझ्यावरचा प्रत्येक वार
भिरभिरणारे गरूडपंख
गरज आहे फक्त तुझ्या
'नवा समाज' प्रसवणारं

घरांमधून सांडत गेले
हिरवे विचार मांडत गेले.
तुझेसुद्धा नवीन होते
माहेराशी सरली नाते
दिवस दिवस लिंपत राहिलीस
गुलाबपाणी शिंपत राहिलीस
तुटत गेलीस आतले आत
प्रारब्धाचे गाणे गात
पुन्हा आठवत पहिला धडा
निधडी छाती ठेवुन लढा
तुझे संस्कार पेलून घेतील
आभाळ हवेत झेलून घेतील
एकदा उंच भरारण्याची
बीज कुशीत थरारण्याची !

## मी गुलाम आहे

-प्रशांत नागरे
प्रथम वर्ष विज्ञान

दोन वेळच्या भाकरीचा मी गुलाम आहे
कृष्णाच्या द्वारकेत भूका सुदाम आहे
लाथाडूनी ज्यांनी आम्हाला क्षुद्र केले
त्यांच्याच पावलांना सच्चा सलाम आहे
पोटाची खळगी भरतांना जनता मरून गेली आहे
नेत्यांच्या ओठी मात्र पिस्ता बदाम आहे
खुनी स्मगलरांची तुरुंगातही मजा आहे.
संन्याशास मात्र फाशीचीच सजा आहे
फासावरती चढुनी स्वातंत्र्य ज्यांनी आणले
कोठे न नोंद त्यांची चेहराही अनाम आहे
सबसे बडा रूपया, हेच सत्य आहे
चलनी जगामध्ये या मी खोटा छदाम आहे !

## आनंदाची लाट

- अशोक प्रभाकर कदम
तृतीय वर्ष कला

आनंदाची एक लाट
माझ्याही दारी आली होती,
शांत होऊन ओसरताना
ती सगळं काही घेऊन होती,
नशेत त्या कोणत्या
मी ही बेधुंद झालो होतो
त्या हास्याचा कल्लोळ करताना
शुद्ध मनाशी हरपलो होतो
क्षणाची नशा
क्षणातच संपली होती,
मग, गगनात भिडलेली नजर
हरवलेले शोधता शोधता
पापण्यातच दडली होती
पुन्हा तोच आनंद पाहून
आज सहज आठवतयं -
अशीच आनंदाची एक लाट
माझ्याही दारी आली होती.

## सुख-दुःख

- निलेश रूपवते
द्वितीय वर्ष कला

हवं असलेलं सगळंच मिळत नसतं
म्हणूनच दुःख कधी संपत नसतं
दुःखामागून सूख येणार
हे कधी विसरायचं नसतं
सुखाकरता तरी एकदा
जगून पहायचं असतं !
सुख एका क्षणाचा सोबती असतो
दुःख अनंतकाळाचा सवंगडी असतो
तरी प्रत्येक दुःखाला अंत असतो
तिथेच सुखाचा अंकुर रूजतो
सुखाच्या वेलीचं आयुष्य
अगदी थोडं असतं कारण
दुःखाच्या वटवृक्षाला
तिथेच वाढायचं असतं !

## नॅक

- अशोक प्रभाकर कदम
तृतीय वर्ष कला (अ)

नॅकची संकल्पना अस्तित्वात आली,
कधी नव्हे ती;
सर्व प्राध्यापकांची युती झाली
वेगवेगळ्या विभागांचे वेगवेगळे प्रमुख
आव्हान स्वीकारण्यास तयार झाले
महाविद्यालयाचे चित्र
हळुहळू बदलायला लागले
'ट्यूटोरिअल' 'डेव्हलपमेंट'; 'इन्फ्रास्ट्रक्चर'
यासारख्या अवजड शब्दांनी;
विद्यार्थी गोंधळून गेले,
कधी नव्हे ते विद्यार्थी
तास व चाचण्या द्यायला लागले
चांगली श्रेणी मिळविण्याच्या प्रयत्नात
सुविधा व शिक्षणाचा दर्जा सुधारला,
स्वच्छता व नीटनेटकेपणा पाहून
विद्यार्थी वर्ग मात्र सुखावला,
नॅकसाठी या बदलांमुळे
महाविद्यालयाचे झाले 'नंदनवन'
नॅक खरोखरच तुझे
मन:पूर्वक अभिनंदन...!

## हे असचं चालायचं..!

- कु. खाडे संगीता पांडुरंग

सूर्याने सकाळी उगवायचं
दुपारच्या वेळी माथ्यावर यायचं
आणि संध्याकाळी मावळीतला जायचं
हे असचं चालायचं
सकाळी सकाळीच लवकर उठायचं
आवरता येईल ते आवरायचं
धावपळ करत निघायचं आणि
एकदाचं कॉलेज गाठायचं
हे असंच चालायचं
पहिल्या लेक्चरला नेहमीच लेट व्हायचं
वहीत लिहीता येईल ते लिहायचं
एखादं लेक्चर बुडवायचं
जमलं तर एखादं लेक्चर करायचं
हे असंच चालायचं
कॉलेजच्या कॅन्टीनमध्ये मित्रांनी जमायचं
गप्पाटप्पात खाता येईल ते खायचं
पैसे देण्यावरून भांडायचं
उधारीवर भागवता आलं तर जमवायचं
हे असंच चालायचं
प्रॅक्टीकलला जायचं म्हणून जायचं
काही नाही आलं तरी तिथंच थांबायचं
करता येईल ते करायचं
मात्र रिझल्टची वाट पाहत नाही थांबायचं
हे असंच चालायचं
परीक्षेपुरतंच पुस्तक वाचायचं

डोक्यात बसवता येईल ते बसवायचं
आठवतं तेवढं आठवायचं
जमलं तर पास व्हायचं नाहीतर
ते पुढे जायचं
हे असंच चालायचं

कॉलेजच्या गर्दीत अचानक तुमचं दर्शन घडायचं
आम्ही नकळत तुमच्या प्रेमात पडायचं
तुम्ही आमच्याकडे हसून पाहिल्यावर
आम्ही खूप खूश व्हायचं
हे असंच चालायचं
मग दररोज तुमच्या दर्शनासाठी तडफडायचं
तुम्हीही आम्हाला पाहून खुष व्हायचं
आजच्या नोटस् लिहिण्यासाठी तुम्ही
आमच्या वहीला मागायचं
आम्हीही कारण नसताना तुमचं जनरल मागायचं
हे असंच चालायचं
कॉलेजमध्ये आम्ही तुमच्याच नादात राहायचं
तुम्हीही कधी - कधी जमलं तर आमच्याकडे पहायचं
अशातच परीक्षेनं माथ्यावर यायचं
परीक्षेत काय लिहिलं ते आमचं आम्हालाही नाही कळायचं
तुमच्या नादात एका वर्गात दोन-तीन वर्ष रहायचं
हे असंच चालायचं
सुट्टीनंतर तुम्ही कॉलेजात नाही यायचं
आम्ही तुमच्याविना दुःखात तडफडायचं
मग अचानक तुम्ही लग्न जमलं म्हणून सांगायचं
आम्हीही मुस्कटात मारल्यासारखं तुमच्याकडे पहायचं
हे असचं चालायचं

## आई

- गोरडे शीला
११ वी कला शाखा

आई माझी सारखी
दिवसभर कामात असते
तब्येतीची मुळी तिला
काळजीच नसते
साऱ्या घराचा भार
एकटीच्या खांद्यावर असतो
दिवसभर काम करुन
तिचा देह झिजतो
आमचे जेव्हा चुकते
कुठे अपयश येते
आई मोठ्या धीराने
दोन शब्द सांगते
आईजवळ जेवढी माया
तेवढी कुणाजवळ नसते
क्षणोक्षणी प्रेमाचा वर्षाव
करणारी आईच असते

## तू...

- मालुंजकर विकास नामदेव
द्वितीय वर्ष कला

जोडता जोडून पाहिले नाते
पण जुळलेच नाही
भाव माझ्या ह्रदयाचे तुला
कधी कळलेच नाही
पाहिले बोलून दोन शब्द
पण तू ऐकलेच नाही
माझ्या ह्रदयाच्या प्रेमाला
तू प्रतिसाद दिलाच नाहीस
तुझी आठवण म्हणून लिहितो काही
पण शब्दच सापडत नाहीत
मनात येते सर्व काही
पण शब्द जुळत नाहीत
तुझ्या सहवासासाठीच केले सर्व काही
पण सफलता मिळालीच नाही
शेवटी हेच खरे की
तू माझ्या नशिबात नाही

## कोणता धर्म श्रेष्ठ आहे ?

- निरंजन देशमुख
तृतीय वर्ष कला

कोणता धर्म श्रेष्ठ आहे ?
या तुमच्या धर्माच्या वादात
मला पडायचे नाही
तोपर्यंत मी
दर्ग्यात जाऊन
नमाज पढून येतो
देव आहे की नाही
हा तुमचा वाद संपेपर्यंत
मी मंदिरात जाऊन
श्रद्धा फुले अर्पण करुन देतो
शक्य झाले तर
धार्मिक दंगलीत
ज्यांची हत्या झाली
त्यांच्या आत्म्यांना
तुम्ही कोणत्या धर्माचे
हा प्रश्न विचारुनच घेतो

## प्रेमभंग

-बुळे सुनिल एकनाथ
प्रथम वर्ष कला

मी आपल्या प्रेमाची बेरीज करणार होतो,
तू मात्र वजाबाकी केलीस !
मी तुझ्या ह्रदयाला संपुर्ण भाग देणार होतो
तू मात्र बाकी ठेवलीस
मी आपल्या प्रेमाला चढता क्रम देणार होतो
तू मात्र उतरता क्रम दिलास
लसावि काढला, मसावि काढला
पायथागोरसाच्या सूत्राचाही काहीही उपयोग झाला नाही
मित्रांच्या सांगण्यावरून पुस्तकात पाहत होतो
सरांना विचारत होतो
गणित तर माझं चुकत नाही ना ?
परंतु नंतर माझ्या लक्षात आले
खरं तर सखे मी तुझ्या नखऱ्याचे
पाढेच पाठ केले नव्हते !

## पहिली कविता

-प्रशांत सुधाकर नागरे
प्रथम वर्ष विज्ञान

रडत खडत चाललेलं आयुष्याचं चाक
मध्येच रुतून बसलं होतं
हताश झालेलं मन
सर्वस्व गमावल्यासारखं भासलं होतं
व्याकुळलेल्या माझ्या मनात
निराशेचे थेंब साचले होते
पण तुझ्या शब्दाने... प्रीतिच्या ओलाव्याने
मनाला उभारी मिळत आहे.
अंधारुन आलेल्या माझ्या विश्वात
आशेचा किरण सापडतो आहे
उष:कालाची आस लावणारी
पहिली कविता स्फुरत आहे

## बेईमान...

- प्रा. चासकर एस. टी.
अकोले कॉलेज, अकोले

का लोभ तुला पैशाचा ?
का लोभ तुला सत्तेचा ?
वरुन पांढरा तू, मन काळ्या डोहापरी भरलेले
भ्रष्टाचारांचा भस्मासूर तू
गोरगरीबांचा काळ तू
तुझेच भाई बांधव, पायी तुडवतील तुला
पंचतारांकित धरतील तुला, मारतील तुला !
पण केव्हा ? आगडोंब उठवीत तेव्हा
बाई, बाटली, पैसा, खुर्ची, भूषण, तुझी
तिरडीवर तेव्हा ठेवतील तुझ्या
स्मशान सिंहासनावर आरुढ करतील तुला
दाहक अग्नीचा चटका देतील तुला
पाशातून एकदाच सुटलो म्हणतील तेव्हा
बेइमान जनतेशी होशील जेव्हा

## आठवणीतला श्रावण

- संदीप गजे
तृतीय वर्ष कला

निळे आकाश,
श्रावण निळा
निळ्या ओढणीआड,
चंद्रही निळा

गतीनं चालणारा
तिचाच पाऊस,
संगतीनं भिजण्याची
तिचीच हौस

केसांवर गुंफलेल्या
श्रावणधारा
मोकळ्या केसांतच
जिवाला थारा